Pune Police

## "प्रेस नोट" दि.०२/११/१६

# पुणे शहरांतील दुचाकी चोरी करुन त्यांचा वापर करुन जबरी चोरी करणारे पुणे शहरांतील रेकॉर्डवरील गुन्हेगारांना प्रॉपर्टी सेल गुन्हे शाखेने अटक करुन गुन्हे उघडकीस आणले.

---

प्रॉपर्टी सेल गुन्हेशाखा,पुणे शहरांकडील प्रभारी अधिकारी श्री. एस.व्हि.शिंदे यांना त्यांचे खास बातमीदाराने माहिती दिली की, साधारण जानेवारी २०१६ मध्ये लल्या ढोकळे याने पल्सर काळे रंगाचे १५० सीसी गाडी चोरुन ती आपले मित्र नामे:-शे-या ऊर्फ शाहरुख शेख यांस दिलेने त्याने व त्याचे इतर मित्र नामे:-दादया घासणी ऊर्फ पिराजी लगाडे,प्रकाश जाधव यांनी त्या गाडीचा वापर करुन न-हे आंबेगांव रोडवरुन एका फ्लिप कार्ट डिलेव्हरी बॉय यांस जबरदस्तीने लुटमारी केलेली असून त्या गाडीचा ते अजूनही वापर करीत असून सध्या त्या गाडीवर ३२९३ असा नंबर टाकून ते दि. २४/१०/१६ रोजी आंबेगांव रोडवर काहीतरी गुन्हा करणार आहेत अशी माहिती मिळाल्याने त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील स्टाफसह आंबेगांव रोडवर सापळा रचून त्यांना दि.२४/१०/२०१६ रोजी पकडून रात्री १९.३०वा.चे सुमारांस अटक करणेत आलेली. त्यांचेकडे केलेल्यां तपासांत सदर आरोपींनी मिळून त्यांचा वाहन चोरी करणारा सदर आरोपींना वाहन चोरी करुन आणून देणारा त्यांचा साथीदार नामे:-लल्यां ऊर्फ ललित दिलीप ढोकळे,वय २१ वर्षे रा.पौड फाटा,पोळेकर वाडा,घर नं.१,कोथरुड,पुणे यांस ही वरील गुन्हयांत दि.२५/१०/२०१६ रोजी रात्री १८.१०वा.अटक करणेत आलेली असून अटक मुदतीत वरील आरोपींना मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो.अे.सी.कोर्ट,पुणे यांचेकडे पोलीस कस्टडी रिमांड रिपोर्टासह हजर केले असतां मा.हुाार कोर्टाने त्यांची वेळोवेळी दि.०२/११/२०१६ रोजीपर्यंतची पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केलेली असून पोलीस कस्टडी मुदतीत वरील आरोपी अनु क्र.१ ते ३ यांनी वाहन चोरी करुन आणून दिलेल्यां गाडयांचा वापर करुन पुणे शहरांतील वेगवेगळयां पोलीस स्टेशनचे हद्दीत जबरी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिलेली असून तसे निवेदन पंचनामा करणेत आलेले असून त्यांचेकडे केलेले तपासांत पुणे शहर व पुणे ग्रामीणचे कार्यक्षेत्रांतील जबरी चोरी व वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले असून त्याचेकडून एकूण १३ दुचाकी त्यामध्ये २२० पल्सर, १५० पल्सर, बुलेट, स्प्लेंडर व यामाहा फ्रेझर अशी वाहने पंचनाम्याने जप्त करणेत आलेली आहेत.

वरील अनु क्र.१ ते ४ यांचेकडून <u>जबरीचोरीचे</u> अनुक्रमे **सिंहगड रोड पो.स्टे.** ३, ,कोंढवा **पो.स्टे. — १, वानवडी पो.स्टे.- १, हडपसर पो.स्टे. १ - खडक पो.स्टे.-१ असे एकुण ७ जबरीचोरीचे गुन्हे उघडकीस आले तसेच भारती विद्यापीठ पो.स्टे. दरोडा -१** तसेच <u>वाहन चोरीचे</u> **अनुक्रमे हडपसर पो.स्टे. -३, सिंहगड रोड पो.स्टे.**— १, **भारती विद्यापीठ पो.स्टे.** — ३, कोंढवा **पो.स्टे.** — १, **अलंकार पो.स्टे.** १, बिबवेवाडी **पोलीस स्टेशनचे वाहन** चोरी — १, **लोणी काळभोर पो.स्टे.**— २, **सासवड पो. स्टे.** — १ असे एकुण वाहन चोरीचे एकुण १३ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. **वरील आरोपी अनु क्र.४ हा**

सहकारनगर पोलीस स्टेशन वाहन चोरीचे व आरोपी अनु क्र.१ व ३ हे भारती विद्यापीठ पो.स्टे.कडील जबरी चोरीचे गुन्हयांमध्ये निष्पन्न व पाहिजे,फरारी आरोपी आहे.

वरील आरोपींकडून एकूण १ दरोडा, ७ जबरी चोरी व १३ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले असून त्यांचेकडून बुलेट (४) पल्सर २२० (२),पल्सर १५० (२) स्प्लेंडर (४) यामाहा फ्रेझर (१) अशी एकूण १३ वाहने व जबरी चोरीतील एकूण ७ व आरोपींचे ताब्यातुन २ मोबाईल हॅन्डसेट असा एकूण १६,४०,०००/-चा मुद्येमाल हस्तगत करणेत आलेला आहे.

१) शाहरुख ऊर्फ शे-यां अकबर शेख,वय २३ वर्षे,धंदा-ड्रायव्हर रा.सी ४/१८१,अपर इंदिरानगर,शंकराचे मंदिराजवळ,बिबवेवाडी,पुणे २) दादया घासणी ऊर्फ पिराजी भगवान लगाडे,वय २० वर्षे,धंदा-घासणी विक्री रा.दुर्गा माता मंदिराजवळ,अपर इंदिरानगर,बिबवेवाडी,पुणे ३) प्रकाश अशोक जाधव,वय २३ वर्षे,धंदा-फ्रुट विक्री रा.मु.पो.शिरवळ,मराठी शाळेजवळ,ता.खंडाळा जि.सातारा ४) लल्यां ऊर्फ ललित दिलीप ढोकळे,वय २१ वर्षे रा.पौड फाटा,पोळेकर वाडा,घर नं.१,कोथरुड,पुणे पुणे शहरांत जबरी चोरी व वाहन चोरीचे गुन्हे दाखल असून ते रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर श्री.पी.आर.पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-१ पुणे शहर,श्री.सुरेश भोसले यांचे सुचनांप्रमाणे प्रॉपर्टी सेल प्रभारी अधिकारी एस.व्हि. शिंदे,स.पो.फौज.आजिनाथ वाकसे,पो.हवा.संतोष मोहिते,संजय सुर्वे,महेश पवार,यशवंत खंदारे,संजय जगताप,चंद्रकांत हाके, अेजाज शिलेदार,सुभाष कुंभार,संभाजी गायकवाड,सिध्दराम कोळी, विजय देशमुख संजय ढोले यांनी केलेली असून पुढील तपास प्रॉपर्टी सेलकडील वरि.पो.निरिक्षक एस.व्हि. शिंदे करीत आहेत.



